# एकात्मिक शेती क्लस्टर (IFC) प्रकल्प अंमलबजावणी मार्गदर्शिका

## उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान

# अनुक्रमणिका

१. DAY-NRLM शेती उपजीविका प्रोत्साहन धोरण: ........ 3

२. DAY-NRLM मध्ये एकात्मिक शेती प्रभाग ची संकल्पना: ........ 3

३. प्रकल्पाचे उद्देश ........ 3

५. अंमलबजावणी धोरण ........ 5

५.१ कृतिसंगम: ........ 5

५.२ त्रिपक्षीय नॉन-फायनान्शियल सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे: ........ 6

५.२.१ KVK/ICAR ची iFC प्रकल्प अंमलबजावणीची भूमिका: ........ 6

५.२.२ MSRLM ची भूमिका: ........ 6

५.२.३ Rapid Rural Community Response to COVID-19 (RCRC) ची भूमिका: ........ 6

५.२.३.१ CSO भागीदार संस्थांची यादी ........ 6

५.४ प्रभाग स्तरावर उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) ........ 7

५.४.१ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) फायदे: ........ 7

५.४.२ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन: ........ 7

६. एकात्मिक शेती प्रभाग च्या मालमत्तेची मालकी आणि प्रशासन ........ 8

७. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मनुष्यबळ धोरण: ........ 8

७.१ Senior CRP ........ 8

७.१.१ Senior CRP साठी निवड निकष: ........ 8

७.१.२ Senior CRP ची भूमिका आणि जबाबदाऱ्या: ........ 9

७.२ एकात्मिक शेती प्रभाग तालुका समन्वयक (IFC Block Anchor): ........ 9

७.२.१ एकात्मिक शेती प्रभाग तालुका समन्वयका साठी निवड निकष: ........ 9

७.२.२ एकात्मिक शेती प्रभाग तालुका समन्वयकाची भूमिका आणि जबाबदाऱ्या: ........ 10

७.२.३ एकात्मिक शेती प्रभाग तालुका समन्वयकाचे मानधन: ........ 10

७.३. उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC Manager): ........ 10

७.३.१ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC Manager) निवड निकष: ........ 10

७.३.२ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC) भूमिका आणि जबाबदाऱ्या: ........ 10

७.३.३ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC Manager) मानधन: ........ 11

७.४ प्रस्तावित पदांची निवड व नियुक्ती निकष ........ 11

८. एकात्मिक शेती प्रभाग समुदाय संसाधन व्यक्ति जिल्हा स्तरीय निवड समिती: ........ 11

९. एकात्मिक शेती प्रभाग अंमलबजावणी मूल्यमापन व संनियंत्रण समिति ........ 11

## १. DAY-NRLM शेती उपजीविका प्रोत्साहन धोरण:

DAY-NRLM च्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरिबांचा समुदाय स्तरीय संस्था बांधणी व त्यांची क्षमता बांधणी करून त्याच्या माध्यमातून सदस्यांचा शाश्वत विकास घडवून आणणे. स्वयं सहाय्यता समूहातील सदस्यांचे सुरवातीला सद्यस्थितीत चालू असलेले शेती आधारित, बिगरशेती उपजीविका उपक्रमाच्या माध्यमातून उत्पन्न वाढविणेसाठी त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता बांधणी करून मार्गदर्शन केले जाते. शेती व बिगर शेती आधारित उपक्रमात समाविष्ट असलेल्या स्वयं सहाय्यता समूह सदस्यांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी एकात्मिक शेती प्रभाग विकास प्रकल्प राबविला जात आहे. यामध्ये प्रामुख्याने जवळ-जवळच्या २ ते ३ गावांचे एकत्रित रित्या उपजीविका उपक्रम बळकट करण्यासाठी भौतिक आणि आर्थिक उद्धीष्टे ठेवून मुल्यवर्धन साखळी विकसित करणे, उपजीविका सेवा केंद्र, शेती उपक्रम, पशुधन आधारित उपक्रम यावर भर देण्यात आलेला आहे.

**टीप-**यामध्ये प्रभाग ही संकल्पना IFC प्रकल्प अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या २ ते ३ गावांसाठीच लागू आहे. यात समाविष्ट असणाऱ्या गावात अभियानाचे सर्व उपक्रम राबवून त्यांची प्रतिकृति उर्वरित भागात देखील टप्याटप्याने राबविणे हा उद्देश आहे. उपजीविका उपक्रम अंमलबजावणी सदरचे IFC प्रभाग ही उपजीविका उपक्रम अंमलबजावणी साठी आदर्श प्रभाग म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे. प्रत्येक कुटुंबाकडे वर्षभर नियमित उत्पन्नाचा प्रवाह उपलब्ध करून देण्यासाठी विविध उत्पन्नाचे स्रोत सुनिश्चित करण्याचा प्रयत्न आहे. उत्पादकांना उत्पादन आणि उत्पादकता वाढवण्यासाठी कुशल बनवणे आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे परवडणाऱ्या दरात कर्ज उपलब्धता सुनिश्चित करणे, बाजारपेठेपर्यंत पोहोचणे आणि सुधारित तंत्रज्ञानाची उपलब्धता ही काही गंभीर आव्हाने आहेत. ते या दृष्टिकोनातून संबोधित केले जाईल.

## २. DAY-NRLM मध्ये एकात्मिक शेती प्रभाग ची संकल्पना:

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत वैविध्यपूर्ण उपजीविकेच्या उपक्रमांमध्ये सुधारणा, विस्तार व मूल्य साखळी विकसित करण्याचा उद्देशाने एकात्मिक शेती प्रभाग (IFC) प्रकल्प उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे एनआरईटीपी अंतर्गत २ ते ३ जवळील गावांमधील २५०-३०० कुटुंबांचा समावेश करून एकात्मिक शेती प्रभाग प्रकल्पाची अंमलबजावणी करावी.

## ३. प्रकल्पाचे उद्देश:

- शेती, दुग्धव्यवसाय, शेळी, मेंढी पालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधुमक्षीका पालन यांसारख्या उपजीविका उपक्रमांतर्गत राबविल्या जाणार आहे. या आधारावर विशिष्ट शेती प्रणाली विकसीत करून महिला शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत करणे.
- तसेच सेंद्रिय शेती उपक्रमांतर्गत शेतातील कंपोस्ट, गांडूळ- कंपोस्ट इत्यादी तयार करून कचऱ्याचा पुनर्वापर करून सेंद्रिय उत्पादनांचा जास्तीत जास्त वापर करणे.
- उपजीविका उपक्रमांचे पर्यावरणावर होणारे नकारात्मक परिणाम कमी करणे.
- उत्पादन खर्च कमी करणे, जोखीम कमी करणे, उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यास मदत करणे.
- दर्जेदार उपजीविका सेवा सुनिश्चित करणे आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे यासाठी गुंतवणूकीस चालना देणे यासाठी समुदायाची क्षमता बांधणी करणे.

- अभियानातील लहान व सिमांत शेतकऱ्यांचे व्यक्तिगत उत्पादनांचे एकत्रितपणे गाव किंवा क्लस्टर स्तरावर लहान उत्पादकांच्या सामूहिक (उत्पादक गट) द्वारे एकत्रित करणे, ज्यामुळे प्राथमिक मूल्यवर्धन आणि बाजार जोडणीचा व्यवहार खर्च कमी होण्यास मदत होईल.
- छोटया उत्पादकांचे समूह एकत्रित आणून त्यांचे उत्पादक कंपनीत रूपांतर करून दुय्यम मूल्यवर्धन, प्रक्रिया, पॅकेजिंग, लेबलिंग आणि मार्केट लिंकेज करणे.
- गांव स्तरावर समान उत्पादन घेणाऱ्या महिला शेतकऱ्यांचे उत्पादक गट स्थापन केलेले असून त्यांच्या मार्फत कृषि निविष्ठा व उत्पादित मालाची एकत्रित खरेदी व विक्री करून प्राथमिक मूल्यवर्धन साखळी विकसित करून त्यांना बाजारपेठेशी संलग्न करने.

## ४. एकात्मिक शेती प्रभागाचे घटक:

**खालील एकात्मिक शेती प्रभागाचे विविध व्यापक घटक आहेत.**


- गाव स्तरावर प्राथमिक मुल्यवर्धन प्रक्रिया युनिटची उभारणी करणे.
- गाव स्तरावर प्राथमिक मुल्यवर्धन प्रक्रिया युनिटची उभारणीसाठी व इतर उपक्रमांसाठी निधी उपलब्ध करून देणे.
- समुदाय संसाधन व्यक्ती (CRPS), KVKS, ICAR द्वारे सुधारित उत्पादकता आणि उत्पादनाकडे नेणारी विस्तार सेवा (Extension सर्विस) विकसीत करणे
- बाजार प्रणाली -PG / PE, मूल्यवर्धन साखळी विकसित करून बाजार जोडणी करणे
- गाव स्तरावर महिलांना मार्गदर्शन व संसाधन उपलब्ध करून सेवेसाठी उपजीविका संसाधन सेवा केंद्र (LSC) विकसित करणे.
- शासनाचे विभाग व इतर संस्था यांचे सोबत कृतिसंगमातून तंत्रज्ञान, प्रशिक्षण, विपणन व्यवस्था विकसीत करणे.

**शेती व शेती आधारित उत्पादन जे एकात्मिक शेती प्रभाग अंतर्गत समाविष्ट केले जाऊ शकतात ते खालीलप्रमाणे आहेत (सूचनादायक):**

- पीकपद्धती- कृषि उपजीविका उपक्रम वृद्धी साठी उपक्रमात एकात्मिक शेती प्रभागांतर्गत मिश्र पीक पद्धती, आंतरपीक पद्धती, बहुस्तरीय पिक पद्धतीचा अवलंब करणे.
- शेतातील विविध पिके जसे की तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया, भाजीपाला, चारा, फुलशेती, फळबाग यांचा समावेश करणे
- **पशुधन विकास:**
    - गाव स्तरावर दुग्ध व्यवसाय, गाय-म्हैस पालन, शेळी-मेंढी पालन, परसातील कुक्कुटपालन, मत्स्य पालन या उपक्रमांमध्ये समाविष्ट शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी मार्गदर्शन करणे.
    - पशुधन अंतर्गत दुभती जनावरे यांच्या विकासासाठी तांत्रिक आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे (उदा.- AI, milk cooling chamber)
    - पशूखादय निर्मितीस चालना देणे उदा.- सुधारित गोठा, मत्स्य शेतीत शेण व lime चा वापर करणे.
    - उत्पादित मालावर मुल्यवर्धन प्रक्रिया करणे. प्राथमिक प्रक्रिया यूनिट स्थापन करणे उदा.- दुग्ध संकलन केंद्र, दुग्धजन्य प्रक्रिया केंद्र, small cooling यूनिट, इ.
    - उत्पादित मालाची बाजार पेठेशी जोडणी करून देणे.
    - प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांची क्षमता बांधणी करणे.

- **मत्स्य शेती:** विविध मत्स्यपालन आधारित उपजीविका उपक्रम शाश्वत उपजीविका मिळविण्यासाठी साठवणूक, तलाव व्यवस्थापन, कुक्कुटपालनासह मत्स्य तलावांचे एकत्रीकरण आणि तटबंदीवर फळे आणि भाजीपाला पिकवणे यासारख्या हस्तक्षेपांना अधिक जोर देणे आवश्यक आहे.
- **मधमाशी पालन:** मध गोळा करणे आणि मधमाशांचे संगोपन करणे.
- बायोगॅस आणि सीमा वृक्षारोपण, कंपोस्ट, गांडूळ खत, समृद्ध कंपोस्ट यांसारख्या पुनर्वापराचे उपक्रम क्लस्टरमधील कृषी कचरा हा एकात्मिक शेती प्रभाग चा अविभाज्य भाग असेल
- **NTFPs:** रेशीम, लाख, औषधी वनस्पती, चिंच, लीफ प्लेट्स इ. उपक्रम राबविणेकरिता महिलांची क्षमता बांधणी करणे

## ५. अंमलबजावणी धोरण




### ५.१ कृतिसंगम:

- अभिसरण संधी एकमेकांना पूरक होण्यासाठी आणि एकात्मिक शेती क्लस्टर (एकात्मिक शेती प्रभाग) च्या प्रचारासाठी समन्वय घडवून आणण्यासाठी उपजीविकेच्या उपक्रमाशी संलग्न शासनाच्या विभागा सोबत काम करणे.
- भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) आणि तिची संस्था- संशोधन केंद्रे जसे की कृषि विज्ञान केंद्र (KVK) एकात्मिक शेती प्रभागा च्या प्रचारात अतिशय सक्रिय आणि महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत.
- कृषी विज्ञान केंद्रे (KVK), Integrated Farming System (IFS) ची ऑन-स्टेशन आणि ऑन-फार्म संशोधन केंद्रे आणि नॅशनल इनोव्हेशन्स इन क्लायमेट रेझिलिएट अग्रीकल्चर (NICRA) सारख्या ICAR संशोधन केंद्रे/संस्थांसोबतचे सहकार्य चालू राहणे आणि सतत प्रशिक्षणासाठी आणखी सखोल मार्गदर्शनासाठी एकात्मिक शेती प्रभागाच्या विस्तारादरम्यान क्षमता वाढवणे विविध एकात्मिक शेती प्रणाली मॉडेल्सवर एक्सपोजर भेटी आणि सतत तांत्रिक सहाय्य मिळवणे.
- ICAR व्यतिरिक्त, भारत सरकारच्या विविध मंत्रालयांच्या इतर विविध योजना/संस्था आहेत ज्या एकात्मिक शेती प्रभाग च्या विस्तारासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतील यासाठी समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

## ५.२ त्रिपक्षीय नॉन-फायनान्शियल सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे:

- भारतीय कृषी संशोधन परिषद, ग्रामीण विकास मंत्रालय आणि रॅपिड रुरल कम्युनिटी रिस्पॉन्स (RCRC - सिव्हिल सोसायटी ऑर्गनायझेशन्सचे एक संघ) यांनी त्रिपक्षीय नॉन-फायनान्शियल सामंजस्य करार (MoU) वर स्वाक्षरी केली.

- देशातील 100 जिल्ह्यांतील ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे या सामंजस्य कराराचे उद्दिष्ट आहे. MSRLM ला 2 मार्च 2021 रोजी नॉन-फायनान्शियल त्रिपक्षीय सामंजस्य करारा प्रमाणे संस्थांसोबत समन्वय ठेऊन प्रकल्प अंमलबजावणी साठीची कार्यवाही करणेसाठी कार्यान्वित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे प्राप्त झाली आहेत.

### ५.२.१ KVK/ICAR ची iFC प्रकल्प अंमलबजावणीची भूमिका:

- इंटरव्हेंशन व्हिलेज क्लस्टरमध्ये सुधारित तंत्रज्ञान आणणे
- सीआरपीला सतत प्रशिक्षण (इन-हाउस वैचारिक, क्षेत्रीय व्यावहारिक, एक्सपोजर भेट आणि नियोजित **iFC** प्रभागतील सर्व गावांमध्ये कृषि विज्ञान केंद्राद्वारे मार्गदर्शन) सह सुविधा देणे.
- KVK/ICAR विद्यमान प्रशिक्षण केंद्रात सुधारणा करेल आणि प्रत्येक क्लस्टरमधील एक गाव दत्तक घेईल आणि त्या क्लस्टरच्या इतर गावांसाठी सुधारित तंत्रज्ञान आणि पद्धतींसाठी या गावांना शिक्षण केंद्र म्हणून विकसित करेल.
- KVK तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी योग्य IEC साहित्य व प्रशिक्षण डेमो साइट किंवा मॉडेल विलेज/क्लस्टर विकसित करेल आणि प्रशिक्षण स्थानिक संदर्भावर आणि स्थानिक भाषेत आधारित असेल. KVK ज्ञान, क्षमता निर्माण आणि विस्तार भागीदार म्हणून अभियान **iFC** आंमलबाजावणीसाठी काम करेल

### ५.२.२ MSRLM ची भूमिका:

- महिलांचे  चे एकात्मिक शेती प्रभागा मध्ये समावेशन करणे.
- आधुनिक शेती आणि संबंधित लागवड पद्धतींसाठी क्षमता निर्माण करणे.
- एकात्मिक शेती प्रभाग ब्लॉक अँकर आणि वरिष्ठ CRPs यांची प्रभागसंघ/ ग्रामसंघामार्फत निवड करणे.
- मूल्यवर्धण साखळी विकसित करणेसाठी आणि फॉरवर्ड लिंकेजसाठी विद्यमान उत्पादक गटांना प्रशिक्षण देणे.
- पायाभूत सुविधा (उदा. प्रक्रिया युनिट्स, सीएचसी, सेंद्रिय इनपुट शॉप, इ.) निर्माण करणे.
- लाइन डिपार्टमेंट सोबत कृतिसंगम करून **iFC** अंमलबजावणीसाठी सहकार्य घेऊन महिलांना लाभ मिळवून देणे.
- ब्रँडिंग, लेबलिंग आणि विपणन क्षमता वाढविणेसाठी महिला उत्पादक गटांना मदत व मार्गदर्शन करणे.

### ५.२.३ Rapid Rural Community Response to COVID-19 (RCRC) ची भूमिका:

- RCRC भागीदार Civil Society Organization (CSO) ची उपस्थिती असलेल्या तालुक्या मध्ये त्यांचे कार्यरत असलेले समर्पित, प्रशिक्षित उपजीविका कर्मचारी **iFC** अंमलबजावणीसाठीचे काम पाहतील.
- RCRC प्रत्येक जिल्ह्यात आपला एक प्रतिनिधि शेती व शेती आधारित कार्यक्रमावर काम करतील आणि स्वतःचे एकत्रीकरण, मूल्यवर्धन आणि विपणन व्यवस्था स्थापन करतील.
- NRLM/SRLM/RCRC हे ज्ञान व्यवस्थापन करतील आणि केस स्टडीजच्या प्रसारासाठी दृकश्राव्य साहित्य गोळा करतील.

#### ५.२.३.१ CSO भागीदार संस्थांची यादी

| अ. क्र. | CSO भागीदार संस्थांचे नाव | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | आयएफसी प्रभागा संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | फाऊंडेशन फॉर इकॉलॉजीकल security (FES) | यवतमाळ | घाटंजी | ४ |
| २ | Cohesion फाऊंडेशन ट्रस्ट | उस्मानाबाद | तुळजापूर | ३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | वॉटरशेड ऑर्गनाइझेशन ट्रस्ट (WOTR) | जालना | भोकरदन | ३ |
| ४ | प्रगती अभियान | नाशिक | त्रिंबकेश्वर | ३ |

**५.४ प्रभाग स्तरावर उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (**LSC)

- IFC प्रकल्पांतर्गत सामाजिक समाविष्ट असणाऱ्या गावातील सर्व सदस्यांसाठी त्यांचे उपजीविका उपक्रमात आवश्यक असणारे तांत्रिक ज्ञान, मार्गदर्शनासाठी तसेच विविध प्रकारच्या सुविधा, निविष्ठा आणि सेवा देण्यासाठी सर्व समावेशक असे सुसज्ज सुविधा केंद्र प्रभाग स्तरावर स्थापन केले जातील.

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र एक वन स्टॉप सुविधा केंद्र म्हणून काम करेल, कारण ते नवीन तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी, इनपुट्स, अद्ययावत शेती यंत्रसामग्री, पशुधन आरोग्य व्यवस्थापनासाठी पशुवैद्यकीय सेवा, सुधारित संगोपन पद्धती, मातीचे आरोग्य आणि पाणी वापर कार्यक्षमता सुधारण्यासाठी सेवा प्रदान करेल.

**५.४.१ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र** (LSC) **फायदे:**

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्रा मुळे लाभार्थींचे ऑपरेशनल कॉस्ट 15% ने कमी होण्यास मदत होईल (transportation cost, processing services, better price realization, etc)

- कुटुंबास गांव स्तरावर उत्तम दर्जाचे उपलब्ध उपक्रमांसाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन व उपक्रम निहाय त्यासाठी लागणारी संसाधन उपलब्ध होतील.


- उपजीविका सेवा केंद्राच्या माध्यमातून क्लस्टर स्तरावर इनपुट आणि सेवा वितरण यंत्रणेचे नेटवर्क विकसित होईल.

- शेती उपयोगी यंत्रणे भाड्याने आणि इतर संबंधित कृषी आणि संलग्न सेवांचा लाभ होईल

- गाव आणि क्लस्टर स्तरावरील सर्व प्रशिक्षण उपजीविका सेवा केंद्रात आयोजित केले जातील. वरिष्ठ CRPs ची क्षमता बांधणी ग्रामस्तरीय CRPs आणि महिला किसान उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र मध्ये केली जाईल.

**५.४.२ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन:**

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन Senior CRP, LSC Manager मार्फत केले जाईल.




## ६. एकात्मिक शेती प्रभाग च्या मालमत्तेची मालकी आणि प्रशासन:

- गावातील VO आणि क्लस्टर स्तरावर CLF नियामक मंडळ म्हणून काम करेल.
- VO आणि CLF प्रकल्पाच्या निधीचा वापर आणि प्रगती यावर लक्ष ठेवतील.
- VO आणि CLF एकात्मिक शेती प्रभाग अंतर्गत व्यावसायिक उपक्रम सुरळीत चालवण्यासाठी वेळोवेळी तपासणी व मार्गदर्शन करतील.
- एकात्मिक शेती प्रभाग मध्ये तयार केलेली मालमत्ता (डाळ मिल, राईस मिल) ही विशिष्ट कम्युनिटी बिझनेस ऑर्गनायझेशन (CBOs) VO, CLF, PG, FPO च्या मालकीची असेल जिच्यासाठी तिचे वाटप केले आहे.
- सर्व प्रकारच्या खरेदीसाठी CBOs द्वारे सामुदायिक खरेदी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जाईल

## ७. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मनुष्यबळ धोरण:

१. क्लस्टर स्तरावर १उपजीविका वरिष्ठ CRP (Senior CRP)
२. तालुका स्तरावर १ उपजीविका ब्लॉक अँकर
३. उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) व्यवस्थापक

उपरोक्त तीनही समुदाय संसाधन व्यक्तींचे नियुक्ती झाल्यावर माहे जून २०२३ या प्रकल्प कालावधिपर्यंत मानधन अभियांनाकडून देय राहील, त्यानंतर माहे जुलै २०२३ पासून नियुक्ती करणाऱ्या व सेवा घेणाऱ्या समुदाय स्तरीय संस्था सदरच्या समुदाय संसाधन व्यक्तींच्या मानधन वितरणासंदर्भात निर्णय घेतील.

### ७.१ Senior CRP

### ७.१.१ Senior CRP साठी निवड निकष:

- किमान १२ वी पास असलेले शिक्षित – जिथे १२ वी पास नसतील तिथे स्थानिक परिस्थिति नुसार अट शिथील करण्याचे अधिकार समितीस राहतील

- अभियानात समुदाय संसाधन व्यक्ति म्हणून काम केल्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा व त्यानुसार प्राधान्य क्रम द्यावा
- समुदाय संसाधन व्यक्तिकडे  ३-४ शेती व शेती आधारित उपजीविके चे स्त्रोत असले पाहिजेत
- विविध ३-५ गावात काम करण्याची तयारी असावी.
- वार्षिक उत्पन्न किमान ७५,००० वर असावे
- निवासी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याची तयारी असावी
- उत्तम संवाद कौशल्य आणि समुदायाला सुलभ रीतीने समजावून सांगता येणे
- ग्राम संघ व उत्पादक गटाचे लेखे लिहिण्याचा अनुभव असावा
- मार्केटिंग ॲक्टिविटी करिता काम पाहण्याची तयारी असावी

**७.१.२ Senior CRP ची भूमिका आणि जबाबदाऱ्या:**

- CRP च्या क्लस्टरमधील गावपातळीवरील उपजीविका CRPs द्वारे प्रशिक्षण देणे आणि अंमलबजावणीला पाठिंबा देण्याची प्राथमिक जबाबदारी असेल
- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे चे व्यवस्थापन
- क्लस्टर व्यवस्थापन
- एकात्मिक शेती प्रभागाचे लेखे नियमित अद्ययावत राखणे
- उत्पादनाच्या मार्केटिंग करण्यासाठी प्रभागाला मदत करणे
- प्रभागतील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेती आधारित उपक्रम) यांना प्रत्येक्ष भेट देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे
- अद्यायवत MIS राखणे
- कामाचा अहवाल देणे
- क्लस्टरच्या VO सह समन्वयाने काम करणे

**७.१.३ Senior CRP मानधन:**

- प्रवास खर्चासह एकूण मासिक मानधन  रुपये ५०००/- इतके आहे.

**७.२ एकात्मिक शेती प्रभाग तालुका समन्वयक (IFC Block Anchor):**

**७.२.१ एकात्मिक शेती प्रभाग तालुका समन्वयका साठी निवड निकष:**

- किमान डिप्लोमा धारण केलेली असावी, पदवी धारक असल्यास त्या व्यक्तीला प्राधान्य देण्यात यावे
- संबंधित व्यक्ति पदवी धारक असल्यास १ वर्षाचा अनुभव असणे गरजेचे आहे. आणि डिप्लोमा झाला असल्यास २ वर्षाचा अनुभव गरजेचं आहे.
- एकात्मिक शेती प्रभाग ब्लॉक अँकर स्थानिक असणे आवश्यक आहे.
- कार्यरत  असलेल्या CAM यांच्यामधून निवड करू शकतात
- कृषी, फलोत्पादन, मत्स्यपालन, पशुपालन, मधमाशी पालन इत्यादी क्षेत्रात प्रगतीशील शेतकरी असू शकते, म्हणजेच शेती व शेती आधारित उपक्रम राबविल्याचा अनुभव असला पाहिजे
- निवासी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याची तयारी असावी
- उत्तम संवाद कौशल्य आणि सामुदायाला सुलभ रीतीने समजावून सांगता येणे
- मार्केटिंग ॲक्टिविटी करिता काम पाहण्याची तयारी असावी
- शेती व शेती आधारित मूल्यवर्धन  साखळी  उपक्रम अमलबजावणी बद्दल माहिती असणे आवश्यक आहे.

**७.२.२ एकात्मिक शेती प्रभाग तालुका समन्वयकाची भूमिका आणि जबाबदाऱ्या:**

- प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी उपजीविका समन्वयकांना मदत करेल
- गावपातळीवरून प्रकल्पाचे अपडेट्स आणि अंमलबजावणीची स्थिती जाणून घेणे
- ब्लॉक स्तरावर प्रकल्पाचे निरीक्षण आणि मूल्यमापन
- वरिष्ठ CRP यांचा कामाचा पाठपुरावा करणे
- प्रभागतील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेती आधारित उपक्रम) यांना प्रत्यक्ष भेट देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे
- LSC चे व्यवस्थापन करणे आणि वैविध्यपूर्ण उपक्रम करून घेणे
- LSC च्या कामाच्या प्रगतीचा  आढावा घेणे
- अद्यायवत प्रगतीचा MIS राखणे
- नियमित तालुका व्यवस्थापन कक्ष व जिल्हा अभियान कक्षाला कामाचा तपशील देणे

**७.२.३ एकात्मिक शेती प्रभाग तालुका समन्वयकाचे मानधन:**

- एकूण मानधन हे रुपये ११,०००/- आणि रुपये २०००/- मासिक प्रवास भत्ता असे एकत्रित रक्कम रुपये १३,०००/- ठोक देय राहील

**७.३. उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC Manager):**

**७.३.१ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC Manager) निवड निकष:**

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (**LSC Manager)** स्थानिक असणे आवश्यक आहे.
- Senior CRP सोबत समन्वय साधून उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन करणे
- किमान 12वी पास असलेले शिक्षित – जिथे १२ वी पास नसतील तिथे स्थानिक परिस्थिति नुसार अट शिथील करण्याचे अधिकार समितीस राहतील
- अभियानात समुदाय संसाधन व्यक्ति म्हणून काम केल्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा व त्यानुसार प्राधान्य क्रम द्यावा
- समुदाय संसाधन व्यक्तिकडे  ३-४ शेती व शेती आधारित उपजीविके चे स्त्रोत असले पाहिजेत
- ३-५ गावात काम करण्याची तयारी असावी.
- वार्षिक उत्पन्न किमान ७५,००० वर असावे
- निवासी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याची तयारी असावी
- उत्तम संवाद कौशल्य आणि सामुदायाला सुलभ रीतीने समजावून सांगता येणे
- ग्राम संघ व उत्पादक गटाचे लेखे लिहिण्याचा अनुभव असावा
- मार्केटिंग अ‍ॅक्टिविटी करिता काम पाहण्याची तयारी असावी
- मूल्यवर्धन साखळी उपक्रम राबविण्याचा अनुभव असणे गरजेचे आहे.

**७.३.२ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC)  भूमिका आणि जबाबदाऱ्या**:

- प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी उपजीविका cadre यांची मदत करेल
- Senior CRP यांच्या सोबत समन्वय साधून LSC चे व्यवस्थापन करणे
- गावपातळीवरून प्रकल्पाचे अपडेट्स आणि अंमलबजावणीची स्थिती जाणून घेणे
- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) चे व्यवस्थापन करणे आणि वैविध्यपूर्ण उपक्रम करून घेणे
- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) च्या कामाच्या प्रगतीचा  आढावा घेणे

- उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC Manager) मधील विविध प्रक्रिया यूनिट (processing unit), एकत्रीकरण सेंटर (Collection Centre), निविष्ठा यांची नियमित देखरेख करणे तसेच महिलांना तांत्रिक सहाय्य करणे
- अद्यायवत प्रगतीचा MIS राखणे
- नियमित तालुका व्यवस्थापन कक्ष व जिल्हा अभियान कक्षाला कामाचा तपशील देणे

**७.३.३ उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक (LSC Manager) मानधन:**

- प्रवास खर्चासह एकूण मासिक मानधन रुपये ६०००/- इतके आहे.

**७.४ प्रस्तावित पदांची निवड व नियुक्ती निकष:**

- एकात्मिक शेती प्रभाग ब्लॉक अँकर, सीनियर CRP आणि LSC व्यवस्थापक यांची निवड जिल्हा अभियान कक्षाकडून करण्यात यावी व नियुक्ती संबंधित प्रभाग संघा मार्फत करण्यात यावी.
- प्रस्तावित पदे ही प्रकल्प कालावधी जुन २०२३ पर्यन्त मर्यादित राहतील
- एकात्मिक शेती प्रभाग ब्लॉक अँकर, वरिष्ठ समुदाय संसाधन व्यक्तीचे (Senior CRP) आणि उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र (LSC) व्यवस्थापक यांची निवड कार्यरत असलेल्या CRP मधून केली असल्यास, त्यांचे मानधन एकाच प्रकल्पा द्वारे काढण्यात येईल याची दक्षता घ्यावी

## ८. एकात्मिक शेती प्रभाग समुदाय संसाधन व्यक्ति जिल्हा स्तरीय निवड समिती:

- अध्यक्ष- जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नामनिर्देशित केलेला अधिकारी
- सह अध्यक्ष- प्रकल्प संचालक
- सदस्य सचिव- जिल्हा अभियान व्यवस्थापक
- सदस्य - जिल्हा अभियान - उपजीविका
- सदस्य - जिल्हा अभियान –MIS
- सदस्य - तालुका अभियान व्यवस्थापक
- सदस्य- नोडल प्रभाग संघ प्रतिनिधि

**जिल्हा स्तरीय निवड समितीची कार्य:**

- समिती गठित करण्याची जबाबदारी जिल्हा अभियान व्यवस्थापक यांची असेल.
- सर्व प्रभाग संघांना पात्र सदस्यांना अर्ज भरणे बाबत कळविणे.
- जिल्हा अभियान व्यवस्थापण कक्ष वरुण पंचायत समिती, प्रभाग संघ, ग्राम संघ यांच्या स्तरावर जाहिरात प्रसिद्ध करणे.
- आलेल्या अर्जाची छाननी करून, पात्र अर्ज असलेल्या सदस्यांची लेखी व तोंडी परीक्षा घेऊन निवड करणे.
- निवड झालेल्या सदस्यांच्या यादीस निवड समिती ची मान्यता घेऊन सदस्यांना नियुक्ती देणे.

**लेखी व तोंडी परीक्षेचे निकष-**

- लेखी परीक्षेची काठिण्य पातळी १२ वी राहील.
- लेखी परीक्षेत कृषि व कृषि संलग्न विषयी ५०% प्रश्न असावेत.
- तोंडी परीक्षा ही फक्त सर्वसाधारण पात्रतेसाठी राहील, त्यास गुणांकण ठेवण्यात येऊ नये.

## ९. एकात्मिक शेती प्रभाग अंमलबजावणी मूल्यमापन व संनियंत्रण समिति:

**जिल्हा स्तरावर:**

- प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान – उपजीविका, जिल्हा अभियान –MIS, संबंधित तालुक्याचे तालुका अभियान व्यवस्थापक (सदस्य सचिव) व १ मॉडेल प्रभाग संघाचे प्रतिनिधि सदस्य यांची संनियंत्रण समिती गठित करण्यात यावी.
- अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान – उपजीविका, जिल्हा अभियान –MIS, यांच्या उपस्थितीत संबंधित तालुक्याचे तालुका अभियान व्यवस्थापक व १ मॉडेल प्रभाग संघाचे प्रतिनिधि सदस्य, सर्व प्रभाग समन्वयक, सर्व प्रभागाचे ब्लॉक अँकर, उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक व वरिष्ठ समुदाय संसादन व्यक्ति यांची मासिक आढावा बैठक घेऊन प्रकल्प अंमलबजावणीचे मूल्यमापन व संनीयत्रण करणे.
- बैठकीचा आढावा अहवाल नियमित राज्य कक्षास सादर करणे.

**तालुका स्तरावर:**

- तालुका व्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखाली तालुका व्यवस्थापन- MIS, प्रभाग समन्वयक, सर्व प्रभागाचे ब्लॉक अँकर, उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्र व्यवस्थापक व वरिष्ठ समुदाय संसादन व्यक्ति यांची मासिक आढावा बैठक घेऊन आवश्यक सूचना देवून प्रकल्प अंमलबजावणीचे मूल्यमापन व संनियंत्रण करणे व त्यांचा दरमहा अहवाल जिल्हा अभियान व्यवस्थापक कक्षाला सादर करावा.